# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ३९५/२०२४ दिनांक २४/१०/२०२४

## प्रेस नोट

**"Share Market App मध्ये ऑन लाईन गुंतवणुक करण्यास सांगुन फसवणुक केलेली संपुर्ण रक्कम 3,28,000/- रुपये रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात काशिगाव पोलीस ठाण्यास यश !!**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील मिरारोड पुर्व परीसरात राहणारे श्री.महेश गोपाळराव गाढवे यांना शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळविण्याचे आमिष दाखवुन आर्थिक फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिगाव पोलीस ठाणे गु.रजि.क्रं. ७०/२०२४ भादंविसं. कलम ४२०, ३४ सह माहीती तंत्रज्ञान(सुधारणा) अधिनियम २००८ कलम ६६(सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून साक्षीदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता, साक्षीदार यांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्याअनुषंगाने साक्षीदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँके सोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर मा.न्यायालयाकडुन साक्षीदार यांची रक्कम परत मिळविण्याकरीता काशिगाव पोलीस ठाणेचे अधिकारी/अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या संपुर्ण रक्कम **3,28,000/-** रक्कम त्यांचे खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Telegram Channel, facebook, Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणाऱ्या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **अश्या प्रकारच्या फसवणुकी मध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुक दारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.**
- **Work From Home नावाखाली Online YoutubeVedio Link Task, Hotel/Movie Rating या सारख्या गुंतवणुक करणा-या फसव्या जाहिरातींना बळी पडु नये.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्या अगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्ककरावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ**
**नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच [www.cybercrime.gov.in](http://www.cybercrime.gov.in) अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परि-०१, मिरारोड, श्री. विजय कुमार मराठे, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. राहुल सोनवणे, पोहवा/सचिन पाटील यांनी पार पाडली आहे.

**----0000----**